CIDCO
WE MAKE CITIES

SUNDAY TIMES OF INDIA, MUMBAI/NAVI MUMBAI
JUNE 22, 2025

# Metro 1: Cidco launches paper QR ticket system

**Navi Mumbai:** The City and Industrial Development Corporation (CIDCO) launched a paper QR ticket system on Navi Mumbai Metro Line 1, which runs along the 11 km span between Taloja and Belapur recently. This marks a crucial advancement towards a Common Mobility Solution. The implementation required an upgrade of the entire Automatic Fare Collection (AFC) ticketing infrastructure to accommodate the new system. Commuters said that it's a welcome move, but of late.

The system's launch took place at Belapur Metro station. CIDCO plans to introduce additional features shortly to improve the travel experience. These include a Mobile Ticketing App for ticket purchases, WhatsApp-Based Ticketing for direct ticket buying through the platform, and the National Common Mobility Card (NCMC) to enable unified payments across various transport networks.

According to CIDCO officials, these services will be accessible to passengers shortly. The development and installation of the QR-based ticketing system was executed by a private firm with oversight from CIDCO and Maharashtra Metro Rail Corporation Ltd. A CIDCO spokesperson said that CIDCO maintains its dedication to delivering superior transport services to passengers. The QR-based ticketing implementation represents a substantial advancement towards this objective, said CIDCO.

— BB Nayak

आपलं महानगर मुंबई । शनिवार २१ जून २०२५

# खारघरमधील घरांची खासियत

• अविनाश चंदने

**काही वर्षांपर्यंत नवी मुंबई म्हटली का डोळ्यासमोर वाशी उभी राहायची. वाशी, नेरुळ, सीवूड्स, कोपरखैरणे यांच्यानंतर नवी मुंबई संपली असे म्हणायचे. मुलुंड ब्रिजनंतर ऐरोली नवी मुंबईत असल्याची जाणीव सर्वांना झाली. मात्र, आता नवी मुंबईचा उल्लेख झाला की डोळ्यासमोर खारघर नोड येतो. खारघरमध्येच घर का हवे, याची अनेक उत्तरे मिळतात. विशेषतः भविष्यातील कनेक्टिव्हिटी पाहता खारघर म्हणजे नवी मुंबईचा मुकूट शिरोमणी म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही.**



सायन-पनवेल महामार्गावर बेलापूर संपले की लगेचच रायगड जिल्ह्याची हद्द सुरू होते. खारघर हे सिडकोने विकसित केलेले नोड असून ते पनवेल महापालिकेच्या हद्दीत आहे. सिडकोने वाशी ते ऐरोली, वाशी ते उलवे-द्रोणागिरी आणि वाशी ते नवीन पनवेल हे नोड विकसित करताना खारघरवर विशेष मेहेरनजर टाकल्याचे वारंवार दिसून येते. खारघरमधील प्रशस्त वसाहत, भव्य खेळांची मैदाने, शाळा-महाविद्यालयांच्या सुविधा, उद्याने हे सर्व आहेच. तरीही महत्त्वाचे म्हणजे येथील वाहतूक व्यवस्था चोख आहे.





## • चोख वाहतूक व्यवस्था

खारघरसाठी सर्वांत जमेची बाजू म्हणजे मेट्रो सेवा. नवी मुंबईत पहिली मेट्रो वाशीमध्ये नाही तर बेलापूर ते तळोजा-पेणधर अशी खारघरमधून धावत आहे. याशिवाय नवी मुंबई परिवहनची (एनएमएमटी) सेवा आहेच. महामार्गावरून राज्य परिवहनची (एसटी) आणि खासगी वाहतूक आहे. मुख्य म्हणजे खारघर रेल्वे स्टेशन आहे. त्यामुळे हार्बरमार्गे थेट मुंबईला छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसपर्यंत, पश्चिम रेल्वेच्या गोरेगावपर्यंत आणि ट्रान्स हार्बरवरून ठाण्याला जाण्याची सुविधा आहे. सर्वांत जमेची बाजू म्हणजे खारघर रेल्वे स्टेशनच्या बाजूला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे.

## खारघरची कनेक्टिव्हिटी

- हार्बर, ट्रान्स हार्बर रेल्वे
- मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वे
- सायन-पनवेल महामार्ग
- मेट्रो सेवा, एनएमएमटी वाहतूक
- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ

## खारघरमधील सुविधा

- शाळा-महाविद्यालयांचे जाळे
- उच्च शिक्षणाच्या अनेक संधी
- खासगी रुग्णालये
- महापालिकेच्या आरोग्य सुविधा

## • एज्युकेशनल हब

खारघर हे शिक्षणासाठी एज्युकेशन हब ओळखले जाते. खारघरसह अवघ्या सहा-सात किलोमीटर परिघात म्हणजे नेरुळ, बेलापूर, कामोठे, नवीन पनवेल परिसरातही अनेक शिक्षण संस्था आहेत ज्या वैद्यकीय (मेडिकल), अभियंता (इंजिनीअरिंग), आर्किटेक्ट, लॉ कॉलेज, फॅशन डिझायनिंग अशी विविध क्षेत्रात मुक्त संचार करत आहेत. राज्य, सीबीएसई, इंटरनॅशनल अशा विविध बोर्डांच्या शाळा आहेत. त्यामुळे शैक्षणिकदृष्ट्या खारघरमध्ये राहणे अत्यंत सोयीचे आहे. केवळ शैक्षणिकदृष्ट्याच नाही नोकरी, व्यवसाय, क्रीडा क्षेत्रात करिअर करू इच्छिणारे या सर्वांसाठी खारघर म्हणजे सर्वोत्तम पर्याय आहे. वैद्यकीय सुविधांचे चांगले जाळे खारघरमध्ये आहे.

## • मॉल, शॉपिंग आणि बरंच काही

शिवाय शॉपिंगसाठी, घरगुती खरेदी, किराणा यासाठी बाजार, मार्ट उपलब्ध असल्यामुळे खारघर हे नवी मुंबईतील सर्वांत परिपूर्ण नोड म्हटल्यास अगदी योग्य होईल. जवळच असलेली तळोजा एमआयडीसीमुळे नोकरदारांची चांगली सोय झाली आहे. शिवाय नवी मुंबईतच नोकरी, व्यवसाय असेल तर रस्त्याचे जाळेही उत्तम आहे. पनवेल-ठाणे आणि पनवेल-सायन महामार्ग तसेच बेलापूरहून सुरू होणारा पामबीच रोड यामुळे कनेक्टिव्हिटीचा प्रश्नच नाही. खारघर नोड प्रशस्त जागेत विकसित केल्यामुळे उद्याने भरपूर आहेत, परिसर हिरवागार दिसतो आणि मुख्य म्हणजे मागे डोंगर असल्यामुळे डोंगराच्या कुशीतील खारघरचे पावसाळ्यातील दृश्य मनाला भुरळ पाडणारे असते. गोल्फ क्लब, सेन्ट्रल पार्क, उत्सव चौक आणि हिरवळीने बहरलेल्या जागा हे खारघरमधील आकर्षण आहे. शिवाय टाटा हॉस्पिटल, इस्कॉन टेम्पल यांना विसरता येणार नाही.

## • किमती आवाक्यात

खारघरमध्ये बजेट होमसह डिलक्स आणि लक्झरी होम्स उपलब्ध आहेत. म्हणजे अगदी ३५ लाखांपासून पुढे काही कोटींपर्यंत घरांची रेंज आहे. ४५ लाखांच्या वन बीएचकेपासून पुढे दोन-अडीच कोटींपर्यंतचे फ्लॅट सर्व सुविधांसह उपलब्ध आहेत. घरांच्या किमती बिल्डर, लोकेशन आणि बिल्डर देत असलेल्या ॲमिनिटीजवर अवलंबून आहेत. बँका तसेच फायनान्शियल इन्स्टिट्यूटकडून कर्ज मिळते. शिवाय गुंतवणूक म्हणूनही खारघर हा उत्तम पर्याय आहे. नवी मुंबई विमानतळ सुरू होण्यासाठी अवघे काही महिने उरले आहेत. त्यानंतर विमानाच्या टेकऑफप्रमाणे जागांचे भाव टेकऑफ करतील.

CIDCO WE MAKE CITIES

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd